# वक्तृत्व एक कला

डॉ. नंदकुमार अच्युत मराठे

ॐ पब्लिकेशन्स्

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**वक्तृत्व एक कला : Vakrutva Ek Kala**
डॉ. नंदकुमार अच्युत मराठे

© **डॉ. नंदकुमार अच्युत मराठे**
४४, समिधा, ब्राह्मण आळी, गोरेगाव,
ता. माणगांव, जि. रायगड

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १२०/-

# *मनोगत*

असे म्हणतात की, माणूस पाण्यात पडला म्हणजे आपोआप पोहायला शिकतो. सर्वच कलांच्या बाबतीत थोडेफार असेच असते. माणसाला काही कला उपजत अवगत असतात तर काही कला प्रयत्नाने आत्मसात करता येतात. अर्थातच प्रयत्नाने असाध्य अशीच कोणतीही गोष्ट नाही. असे असले तरीही प्रयत्न करताना ते अचूक आणि अथक व दीर्घकाळ केल्याविना कोणत्याही क्षेत्रातले यशाचे शिखर आपणास गाठता येणार नाही हेदेखील ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. वक्तृत्व कलेचेदेखील असेच आहे. बोलणारे सगळेच असतात. जो मुका नाही तो प्रत्येकजण काही ना काही, कुठे ना कुठे बोलतच असतो. परंतु परिणामकारक आणि योग्य बोलणे सगळ्यांनाच जमत नाही. म्हणूनच सगळ्यांच्या बोलण्याला भाषण असे कोणीही म्हणत नाही, आणि सगळ्यांनाच वक्ता असेही म्हणत नाहीत आणि म्हणूनच बोलण्याची कला म्हणजेच वक्तृत्व कला आत्मसात करायची असेल तर त्यासाठीही योग्य दिशेने अचूक आणि अथक प्रयत्न करावे लागतील.

अलीकडच्या काळात नवनवी क्षितिजे आपल्यासमोर येत आहेत. या विविध क्षेत्रांपैकी आपण कोणते क्षेत्र निवडावे आणि आपले जीवन यशस्वी करावे याचीही काळजी दक्ष पालक वर्ग आणि त्यांचे पाल्य करीत आहेत. या विविध क्षेत्रांच्या दिशेने आपण आपला मार्ग आक्रमित असताना, वाटेमध्ये अधूनमधून वाटाडे आणि मार्गदर्शकही अलीकडच्या काळात आपल्या भेटीला येत असले तरीही त्या मार्गाने वाटचाल मात्र आपली आपल्यालाच करावी लागते हे ध्यानात घेणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. आपण आपल्या ध्येयमंदिराकडे जाणाऱ्या वाटेने वाटचाल करीत असताना वाटेत येणारे अडथळे पार करीत, खाचखळगे चुकवित, आपण कोणावर धडकणार तर नाही ना याची काळजी घेतच आपल्याला आपली वाट चालावी लागते. म्हणूनच केवळ वाटाड्या असून चालत नाही. विशेषत: अपयशाचे, निराशेचे अनेक धक्के पार करीत हा प्रवास आपल्याला करावा लागतो.

मी स्वत: ज्यावेळी विविध प्रकारच्या भाषणांच्या माध्यमातून विविध प्रसंगांचेवेळी या वक्तृत्व कलेची उपासना करू लागलो त्यावेळी मलाही या मार्गाने जाताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले, सामोरे जावे लागले. परंतु 'संघटन बळे चलो । सुपंथपर गढे चलो' या उक्तीप्रमाणे हा प्रवास असाच चालू ठेवावा. प्रत्येक टप्प्यावर अधिक आत्मविश्वासाने, अधिक निर्भयपणे येणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्याचे धाडस करू लागलो आणि आज विविध प्रकारची, विविध प्रसंगांमध्ये, विविध ठिकाणी, विविध प्रकारच्या श्रोत्यांसमोर अक्षरश: हजारो भाषणे केली. प्रवचनकार म्हणून आणि कीर्तनकार म्हणूनही अत्यंत मोलाचा असा अनुभव माझ्या गाठीशी आज जमा झाला. या माझ्या वैयक्तिक वाटचालीत माझ्यासमोर आलेल्या समस्या, त्यासाठी, त्यांना सामोरे जाऊन त्यांच्यावर मात करण्यासाठी मला करावी लागलेली मेहनत, त्यामुळे मिळत गेलेले यश या सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर आपल्याला आलेले हे अनुभव इतरांनाही मार्गदर्शक होतील, आपण केलेल्या मेहनतीचे स्वरूप इतरांनाही समजेल आणि त्यांनाही या क्षेत्रात यशस्वी होता येईल असे वाटण्याने ते सर्व रसिक वाचकांच्यासमोर या पुस्तकाद्वारे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात माझ्या अनुभवाचा इतरांना उपयोग किती आणि कसा होईल हे व्यक्तीपरत्वे ठरणार असले तरीही या लेखनाचा त्यांना नाममात्र फायदा झाला तरीही हा प्रयत्न सार्थकी लागला असे मला वाटेल आणि म्हणूनच हे वेगळ्या प्रकारचे लिखाण करण्याचा निर्णय मी घेतला.

ॐ पब्लिकेशन्स् यांनी विविध विषयांवरील पुस्तके छापण्याचा निर्णय घेऊन तशा प्रकारच्या पुस्तकांच्या निर्मितीचे आवाहन केले आणि त्या आवाहनाला प्रतिसाद देण्याचा निर्णय मी घेतला. त्यांच्या या आवाहनामध्ये 'वक्तृत्व कले' संबंधीचे आवाहन वाचल्यानंतर त्या स्वरूपाचे एक पुस्तक आपणही लिहावे असे माझ्या मनाने घेतले. त्यांच्या प्रेरणेने लेखनाला सुरुवात झाली आणि श्रीगणेशाच्या कृपेने ते पूर्णत्वालाही गेले. केवळ महिनाभराच्या कालखंडातील अथक प्रयत्नांमधून साकार झालेले हे पुस्तक रसिकांच्या हाती देताना आज मात्र अतीव आनंद होत आहे. यापूर्वी माझ्या प्रसिद्ध झालेल्या विविध पुस्तकांना रसिक वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळालाच आहे. याही पुस्तकास वाट वेगळी असली तरीही असाच उदंड प्रतिसाद रसिक वाचकांकडून मिळेल असा मला विश्वास आहे.

कोणतीही निर्मिती करीत असताना प्रत्येक निर्मात्याला खूपच जीवनकळा- प्रसव कळा सहन कराव्या लागतात. या पुस्तक लेखनाच्या वेळीही अशाच प्रकारच्या कळा मला सोसाव्या लागल्या. अनंत अडचणींना सामोरे जावे लागले परंतु दृढनिश्चय आणि अथक परिश्रमांमुळे कार्यसिद्धी होत असते याची जाणीव असल्यामुळेच चिकाटी मात्र सोडली नाही आणि आज हे कार्य पूर्णत्वाला गेले. असे म्हणतात की, आप्तजनांच्या सहवासात सुख दुणावते आणि दुख उणावते. या पुस्तकाचे वेळीही असाच काहीसा अनुभव मला आला. एका आगळ्या वेगळ्या विषयावरचे, वेगळ्या ढंगाचे हे लेखन चालू असताना या लेखन प्रवासात हस्ते परहस्ते अनेकांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत मला झाली आहे. त्या सर्वांचा नावासहित ऋणनिर्देश करणे मला शक्य नाही. तरीही काही विशेष नावांचा उल्लेखन केल्यास तो कृतघ्नपणा ठरेल म्हणूनच केवळ त्यांचे ऋणनिर्देश करण्याचे धाडस करतो आहे. यामध्ये सर्वप्रथम अर्थातच श्री. शितल मेहता यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी पत्राद्वारे असे आवाहन केल्यामुळेच हे वेगळ्या प्रकारचे लेखन करण्याचे धाडस मी करू शकलो.

वक्तृत्वासंबंधी आवश्यक असणारी माहिती नेटच्या साहाय्याने, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मदत करणारे विद्यावर्धिनी क्लासेस न्यू पनवेलचे मालक श्री. विनित जोशी व त्यांच्या सौ. वरदा जोशी या दोघांचीही खूपच मोलाची मदत झाली. त्यामुळे काही वेगळे संदर्भ मला देता आले. त्यांच्याबरोबरच माझ्या प्रत्येक कामात मला अधिकाअधिक वेळ मिळावा म्हणून संपूर्ण घरकारभार दक्षतेने सांभाळणारी माझी पत्नी सौ. स्नेहल आणि बाबांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून या हेतूने मला त्रास न देता त्यांच्या कामात व्यस्त असणारी माझी मुलगी कु. वैदेही व मुलगा कु. स्वानंद यांचीही मला खूपच मदत झाली आहे. त्याचबरोबर माझे असंख्य मित्र, चाहते, सगेसोयरे, रसिक वाचक या सर्वांच्या प्रेमामुळेच या साहित्याच्या क्षेत्रात मी आता हळूहळू स्थिरावतो आहे. माझ्या भाषणाला, प्रवचनाला, कीर्तनाला येणारे रसिक श्रोते, त्यांना विसरून कसे चालेल. म्हणून समर्थ रामदास स्वामींच्याच शब्दांत ‘श्रोते तुम्ही जगदीश मूर्ती। तेथे माझी व्युत्पत्ती किती ?।।’ असे म्हणून थांबतो.

‘इत्यलम्।।’

**डॉ. नंदकुमार अच्युत मराठे**

# अनुक्रमणिका


- प्रकरण पहिले .................... १३
- प्रकरण दुसरे .................... २१
- प्रकरण तिसरे .................... ३३
- प्रकरण चौथे .................... ४१
- प्रकरण पाचवे .................... ६१
- प्रकरण सहावे .................... १००
- प्रकरण सातवे .................... ११४
- प्रकरण आठवे .................... १४०
- प्रकरण नववे– उपसंहार .................... १६०
- संदर्भ ग्रंथ .................... १६७


✦✦

# प्रकरण पहिले

सर्वसाधारणपणे वक्तृत्वाचा अर्थ 'बोलणे' असा केला जातो. मनुष्य म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येकाला काहीतरी बोलायचे असते. एवढेच नव्हे तर पशू पक्ष्यांना, झाडावेलींना परस्परांबरोबर विविध विषयांवर बोलायचे असते, आपल्या मनातील खळबळ दुसऱ्या कोणाला तरी सांगायची असते. अर्थात आपल्या मनातला हा भाव दुसऱ्यासमोर प्रगट करताना विविध प्रतिमांचा किंवा विविध प्रतीकांचा वापर प्रत्येकजण करीत असतो. त्यासाठी विविध प्रकारच्या शब्दांचा, चित्रांचा, रंगछटांचा, अंगविक्षेपकांचा, विविध अवयवांचा, मुद्रांचा, अविर्भावांचा अथवा वस्तू वा प्राण्यांचाही उपयोग करून आपण आपल्या मनातील विचार दुसऱ्याला सांगण्याचा प्रयत्न करतो. तर काहीवेळा यातले काहीही न करताही एखादी व्यक्ती खूप काही बोलत असते. परंतु या अशा प्रकारच्या सर्वच बोलण्यात वक्तृत्व म्हणून मान्यता मिळत नाही. या बोलण्यापैकी काही जणांचे बोलणे केवळ बाष्कळ बडबड ठरते, तर काही जणांचे बोलणे वचवच बोलण्यासारखे असते. काही जणांचे बोलणे निरर्थक तर काही जणांचे योग्य स्वरूपाचे असते. काही जणांचे बोलणे आत्मप्रौढी सांगणारे तर काही जणांचे दुसऱ्याची निंदा नालस्ती करणारे असते. कोणी बोलताना वाद घालतात, तर कोणी वाद घालण्यासाठी बोलतात. कोणी वितंडवाद करतात तर कोणी संवाद साधण्याचा प्रयत्न करतात. कोणी आपल्या बोलण्यातून इतरांचे

आयुष्य उद्ध्वस्त करतात तर कोणी आपल्या बोलण्याने इतरांचे हित साधण्याचे, कल्याण करण्याचा प्रयत्न करतात. एकूण काय प्रत्येक जण कोणत्या ना कारणाने बोलतच असतो.

या अशा प्रकारच्या सर्व प्रसंगांमध्ये बोलणे हे अपरिहार्य असते. जी माणसे कमी बोलतात त्यांना आपण 'घुमी' म्हणतो. तर जी माणसे जास्त बडबडतात त्यांना आपण 'वाचाळ' किंवा 'तोंडाळ' म्हणतो. काही माणसे भडाभडा ओकल्याप्रमाणे आपल्या मनातले सर्व काही घडाघडा बोलून ओकून टाकतात तर काही आतल्या गाठीची माणसे आवश्यक तेवढेच बोलतात. काही माणसांना विचार करूनच बोलायची सवय असते तर काही माणसे आपल्या मनातले बोलून झाल्यावर त्याबद्दल विचार करीत असतात. काही माणसे बोलण्यामध्ये चतुर असतात तर काही माणसे बोलताना चतुराईने बोलतात. एखादी व्यक्ती मोजकेच बोलणारी असते तर एखादी व्यक्ती मार्मिक बोलण्यात पटाईत असते. एखाद्या व्यक्तीचे बोलणे आपल्याला आवडले नाही तर आपण 'तुझी वटवट बंद कर' असा सज्जड दम त्या व्यक्तीला भरतो, तर एखाद्या व्यक्तीच्या मिनतवाऱ्या करून, आर्जवे करून आपण त्या व्यक्तीने काहीतरी बोलावे म्हणून त्या व्यक्तीच्या मागे लागतो. एखादी व्यक्ती त्या व्यक्तीची गुपिते आपल्या समोर उघड व्हायला नकोत म्हणून आपल्या बरोबर बोलायचेच टाळते तर काही वेळा आपले बोलणे दुसऱ्याने ऐकू नये म्हणून बोलणारी माणसे अशा व्यक्तीसमोर बोलायचेच टाळतात. काही माणसांना चोरून बोलायची सवय असते तर काही जणांना दुसऱ्याचे चोरलेले बोलायची सवय असते. अशा रीतीने प्रत्येकाला काही ना काही बोलायचे असते. म्हणूनच कदाचित भारतीय संविधानाने आपल्याला भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. **म्हणी, वाक्प्रचार इ.** अशा प्रकारच्या बोलण्याच्या संदर्भात अनेक मराठी म्हणी, वाक्प्रचार, शब्दप्रयोग आपल्याकडे प्रसिद्ध आहेत. त्यापैकी काहींचा उल्लेख इथे करणे गैर ठरणार नाही. उदा. बोलाचीच कढी बोलाचाच भात, बोलाफुलाला गाठ, बोल घेवडा, बाष्कळ बडबड, वचवच बोलणे, वटवट करणे, वाचाळ, घुम्या, बडबडे कासव, बोलका पोपट, पोपटपंची, भारदस्त

बोलणे, बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले, गर्जेल तो पडेल काय ? सत्यं ब्रूयात प्रियं ब्रूयात, गाढवा पुढे वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता, बालिश बहु बायकांत बडबडला, वाचीवीर, तोंडाळ, कटकट्या, बुलंद आवाज, चिरका आवाज, पहाडी आवाज, किनरा आवाज, बायकी आवाज, नाकातले बोलणे, फट म्हणताच ब्रह्महत्या, गरळ ओकणे, मुखस्तंभ, वायफळ बडबड, आपण सांगे लोकाला शेंबूड आपल्या नाकाला, फुकाचे मुखी.

**जीवनाचा अविभाज्य भाग :–** बोलणे, काहीतरी बोलणे हे आपल्या सर्वांच्याच जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेले असले तरीही सर्व प्रकारच्या बोलण्याला कोणीही कला म्हणत नाही. म्हणूनच बोलणारे सगळेच असले तरीही बोलण्याची कला सगळ्यांनाच अवगत असते नाही. यासाठीच शिक्षणाची उद्दिष्टे ठरविताना, लिहिणे, वाचणे, याबरोबरच विद्यार्थ्याला समाजासमोर स्वत:ला मांडता यायला पाहिजे, आपले विचार प्रगट करता आले पाहिजेत हे देखील उद्दिष्ट ठरविण्यात आले म्हणूनच सुसंगत बोलण्याला, निश्चित विषय धरून, विशिष्ट हेतूच्या पूर्ततेसाठी विशिष्ट प्रकारे बोलाण्याच्या कलेला वक्तृत्व कला म्हणून एक विशेष दर्जा प्राचीन काळापासून प्राप्त झाला आहे.

खरे पाहाता आपण सर्वजण कां बोलतो ? संस्कृत सुभाषितकार म्हणतात, 'मौनं सर्वार्थ साधनम्' म्हणजेच मौन धारण केल्यामुळेच चारही प्रकारच्या पुरुषार्थांची आपल्याला प्राप्ती होते. म्हणूनच मौन हे, न बोलणे हे पुरुषार्थ प्राप्त करून घेण्याचे श्रेष्ठ साधन आहे. असे असतानाही आपण बोलतो, आपल्याला बोलावे असे वाटते. कां बरे ? वास्तविक पाहाता शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करता आपण आपल्या बोलण्यामधून कितीतरी प्रमाणात आपल्या शरीरातील ऊर्जेचा नाश करीत असतो आणि आपले स्वत:चेच नुकसान करून घेत असतो. असे असूनही आपण बोलतो का बरे ?

**आपण का बोलतो :–** प्रत्येक जीव आपल्या ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून विविध प्रकारचे अनुभव घेत असतो. पावसाची पहिली सर अंगावर पडल्यानंतर, आकाशामध्ये इंद्रधनुष्याची सुंदर सप्तरंगी कमान दिसल्यानंतर, पहाटेच्या

प्रभातीच्या वेळी पूर्व क्षितिजावर तांबडे फुटल्यानंतर, झुंजुमुंजु झाल्यानंतर, थंडीच्या दिवसात सकाळचे पिवळे परंतु कोवळे ऊन अंगावर पडल्यानंतर, मावळतीच्या वेळी पश्चिम क्षितिजावर सहस्र रश्मीने संध्येच्या गालावर उधळलेले रंग पाहिल्यानंतर,उषेच्या गालावरील रक्तिमा पाहिल्यानंतर, प्रिया मिलनानंतर, नवनिर्मितीनंतर या व अशा प्रकारच्या अन्योन सृजनाच्या, सर्जनशीलतेच्या अनुभूतीच्यावेळी आपण घेतलेले अनुभव उत्स्फूर्तपणे हृदयाच्या गाभाऱ्यातून उसळी घेऊन बाहेर येतात आणि त्याला शब्दरूप प्राप्त होते. याचेच वर्णन करताना संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात, 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी।' हा असा आतून येणारा सृजनाचा उत्स्फूर्त आविष्कार रोखून धरायला आपण असमर्थ ठरतो आणि मग वैखरीतून बाहेर पडण्यापूर्वी त्या आविष्काराला हृदयामध्ये उचंबळणाऱ्या त्या भावनांना परावाणीचा स्पर्श झाला म्हणजे त्याला शब्दरूप येण्यासाठी आपला जबडा आपल्याही नकळत उघडला जाऊन स्वरमण्यावर त्या भावनांच्या कल्लोळाचा आघात झाला म्हणजे त्यातून जो झंकार उमटतो, ध्वनी बाहेर पडतो तो ध्वनी म्हणजेच शब्द होय. आपलीही अनुभूती प्रगट करण्यासाठी, आपल्या अनुभूतीचे अन्य कोणी तरी सहभागी व्हावे या उत्कट इच्छेने, अपेक्षेने आपण बोलतो. अशा वेळी आपल्यासमोर कोणी असो वा नसो, आजुबाजूला कोणीही नसताना आपण बोललो तर लोक आपल्याला काय म्हणतील याचा किंवा आपल्या प्रतिष्ठितपणाचा, आपल्या वयाचा, स्थितीचा कसलाही विचार न करता आपण बोलतो. आपल्या मनातली खळबळ दाबून ठेवणे असह्य झाल्याने आपण बोलतो, सर्व चराचर सृष्टी बोलते. आपल्या मनातील भावनांचे प्रगटीकरण करण्यासाठी आपण बोलतो, आपल्या मनातील विचार दुसऱ्याला कळावेत, आपल्या बद्दलची इतरांची काय प्रतिक्रिया आहे समजून घेण्यासाठी आपण बोलतो, आपल्याला काय हवे आहे ? आपल्याजवळ काय आहे ? आपल्याला काय नको आहे ? आपल्याजवळ काय नाही ? हे कोणाला तरी कळावे म्हणून आपण बोलतो, आपला राग व्यक्त करण्यासाठी, आपला तिरस्कार प्रगट करण्यासाठी, समोरच्या माणसाचा द्वेष करण्यासाठी, दुसऱ्याला खच्ची करण्यासाठी, एखाद्याची निंदानालस्ती